प्रेस नोट दि.२८/०२/२०२५

तुळींज पोलीस स्टेशनचे लोकसेवक १) पो.शि.१४०६५ पांडूरंग विठ्ठल सगळे वय ३४ वर्षे नेम.तुळींज पोलीस स्टेशन व खाजगी इसम २) आदर्श सुनिल गुप्ता यांना लाच स्विकारतांना अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागाने घेतले ताब्यात

| | | |
|---|---|---|
| अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो/ घटक | :– | ठाणे युनिट |
| पोलीस स्टेशन डायरी नोंद क्रमांक | :– | तुळींज पोलीस स्टेशन, मिरा भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्तालय<br>पोलीस स्टेशन डायरी नोंद क्र.०५४/२१.४९ वा. दि.२८.०२.२०२५ |
| लोकसेवकाचे नांव व कार्यालय | :– | १) पो.शि.१४०६५ पांडूरंग विठ्ठल सगळे वय ३४ वर्षे नेम.तुळींज पोलीस स्टेशन ( वर्ग–३) रा.एम.यु.२०५ एव्हरशाईन सिटी विणा डेव्हलपर्स दुसरा माळा आचोळे तलावा जवळ वसई पुर्व<br>२) खाजगी इसम आदर्श सुनिल गुप्ता वय २२ वर्षे धंदा– पानटपरी रा.रुम नं. ३ सुनिल किशन नगर काजूपाडा तुळींज रोड नालासोपारा पुर्व |
| मागितलेली लाचेची रक्कम | :– | ५०,०००/– रु. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | :– | ५०,०००/– रु. |
| थोडक्यात हकीगत | :– | यातील तक्रारदार यांना यातील लोकसेवक पो.शि.पांडूरंग विठ्ठल सगळे एम.डी.विक्री करण्याकरीता दरमहा ५०,०००/–रुपये हप्ता म्हणून लाचेची मागणी केली होती. परंतु तक्रारदार यांना लोकसेवक सगळे यांना लाच दयावयाची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक २५/०२/२०२५ रोजी लोकसेवक सांगळे हे ५०,०००/–रू. लाचेची मागणी करीत असल्या बाबत अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो,ठाणे कार्यालयात लेखी तक्रार नोंदवली.<br>. त्याप्रमाणे दिनांक २७/०२/२०२५ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई मध्ये लोकसेवक पो.शि.पांडूरंग सगळे यांनी तक्रारदार यांचेकडे ५०,०००/–रु. लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम खाजगी इसम पानटपरी चालक यांचेकडे देण्यास सांगितले. आज दिनांक २८/०२/२०२५ रोजी लोकसेवक पो.शि.पांडूरंग विठ्ठल सगळे यांनी खाजगी इसम आदर्श सुनिल गुप्ता यांचे करवी ५०,०००/–रु. लाचेची रक्कम स्विकारताच खाजगी इसम यांना रंगेहाथ पकडण्यात आले.<br>तसेच लोकसेवक पो.शि.पांडूरंग विठ्ठल सगळे तुळींज पो.स्टेशन येथून ताब्यात घेण्यात आले असून, त्याबाबत तुळींज पोलीस स्टेशन येथे स्टेशन डायरी नोंद क्र.०५४/२१.४९ वा. दि.२८.०२.२०२५ अन्वये नोंद घेण्यात आलेली आहे. सदर बाबत पुढील कारवाई सुरु आहे |

**मार्गदर्शन अधिकारी–मा.श्री.शिवराज पाटील,पोलीस अधीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

**मा.श्री.सुहास शिंदे सो.अपर पोलीस अधीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

**मा.श्री.संजय गोविलकर सो.अपर पोलीस अधीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र,ठाणे**

अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागा तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा–या लोकसेवका बद्दल तक्रार असल्यास अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---

१) संपर्क पत्ता :– लाप्रवि, ठाणे मध्यवर्ती कारागृहा समोर, ठाणे पश्चिम ४००६०१
२) संकेतस्थळ :– acbmaharashtra@mahapolice.gov.in
३) ई–मेल आयडी :– spacbthane@mahapolice.gov.in
४) अ‍ॅप्लीकेशन :– acbmaharashtra.net
५) टोल फ्री क्र. :– 1064
६) दुरध्वनी क्रमांक :– 022--20813599

पोलिस निरीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो ठाणे

Kavale

( विजय कावळे )
पोलीस निरीक्षक,
अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे.